## सर अल्बर्ट हॉवर्ड सेंद्रिय शेती सामाजिकता पुरस्काराने

# डॉ. बी.बी. पवार यांचा गौरव



डॉ. श्री. बी.बी. पवार यांना पुरस्कार प्रदान करताना 'नवनिर्माण न्यास'च्या कार्यकारी विश्वस्त वसुधा सरदार व महाराष्ट्र कृषी शिक्षण- संशोधन परिषदेचे संचालक डॉ.श्री. हरिहर कौसडीकर. समवेत 'रोमिफ'चे अध्यक्ष श्री. प्रशांत नाईकवाडी, 'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार आदी मान्यवर.

ज्येष्ठ कृषिशास्त्रज्ञ, राहुरीस्थित महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव तसेच **'पूर्वा कृषिदूत'** मासिकाचे संस्थापक संपादक **डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार** यांना 'रोमिफ इंडिया'तर्फे 'सर अल्बर्ट हॉवर्ड सेंद्रिय शेती सामाजिकता' पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. त्या निमित्ताने त्यांना देण्यात आलेल्या सन्मानपत्राचा हा संपादित अंश...

-तसे बघता इ.स. १९०५- १९२८ दरम्यान सेंद्रिय शेतीची काहीशी सुरुवात युरोप व भारतात झाली होती. ब्रिटनचे जीवरसायन शास्त्रज्ञ सर अल्बर्ट हॉवर्ड, ज्यांना 'फादर ऑफ मॉडर्न ऑरगॅनिक ॲग्रीकल्चर' (आधुनिक सेंद्रिय शेतीचे उद्गाता) असे म्हटले गेले आहे; त्यांनी भारतात पुसा आणि बंगाल प्रांतांमध्ये कृषी सल्लागार म्हणून काम करताना येथील परंपरागत शेती पद्धतीचा लेखाजोखा मांडला व रासायनिक शेती पद्धतीपेक्षा भारतीय शेतीपद्धती सरस आहे हे सिद्ध केले.

सर अल्बर्ट हॉवर्ड यांच्या 'ॲन ॲग्रीकल्चर टेस्टामेंट' (कृषी क्षेत्रातील पुरावे) या पुस्तकात सेंद्रिय शेती पद्धतीविषयी ठामपणे लिहिले गेले. तसेच १९४७ मध्ये 'दि सॉईल ॲण्ड हेल्थ, ए स्टडी ऑफ ऑरगॅनिक ॲग्रीकल्चर' (जमीन आणि आरोग्याबाबत सेंद्रिय शेतीचा अभ्यास) या ग्रंथातील लॉर्ड नॉर्थबोर्न यांच्या 'सेंद्रिय शेती' या शब्दप्रयोगातून सर अल्बर्ट हॉवर्ड यांनी 'सेंद्रिय शेती' या शीर्षकाचे पहिले पुस्तक लिहिले. सर अल्बर्ट हॉवर्ड यांचे सेंद्रिय शेतीतील योगदान खूप स्पृहणीय आहे. त्यांचा हा वसा पुढे घेऊन जाताना त्यांची स्मृती व या क्षेत्रातील संशोधन यांची नेहमी आठवण राहावी, जेणेकरून सेंद्रिय कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या शेतकरी समुदायामध्ये एक उमेद व कामाबद्दलचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा; या प्रांजळ हेतूने सेंद्रिय शेती क्षेत्रातील भरीव योगदानाबाबत डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मा.श्री. अण्णासाहेबांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे वनस्पतीशास्त्र या विषयात संशोधन करून आचार्य पदवी मिळविली, त्याचप्रमाणे काही काळ विद्यापीठात कुलसचिव या अत्यंत महत्त्वाच्या पदाचा कार्यभार सांभाळला. तसेच गहू विशेषज्ञ म्हणून देखील ख्याती मिळविली. सेवानिवृत्तीनंतर 'पूर्वा कृषिदूत' मासिकाची संपादकीय सुरुवात केली. या मासिकाच्या माध्यमातून सेंद्रिय शेती या विषयाला विशेष महत्त्व देऊन महाराष्ट्रातील अनेक कृषिविषयक प्रश्नांनाही एक चांगले व्यासपीठ मिळवून दिले. त्याचप्रमाणे ते आजही देशी गायींचे संवर्धन तसेच सेंद्रिय शेतीतील मधमाश्यांचे महत्त्व हे विषय सामान्य शेतकऱ्यांपर्यंत अत्यंत शास्त्रीय रीतीने पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. मा.श्री. अण्णासाहेबांनी 'शेतकरी', 'बळीराजा', 'गोडवा' या मासिकांसह अनेक नियतकालिकांमधून अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. 'कृषिमंथन', 'शाश्वत सेंद्रिय शेती' तसेच 'दिशा समाज प्रबोधनाची' ही त्यांची ग्रंथसंपदा मान्यवरांनी गौरविली आहे.

'रेसिड्यू फ्री ऑरगॅनिक मिशन इंडिया फेडरेशन' (रोमिफ), पुणे आणि सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनी, मोहाडी, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच राज्यस्तरीय सेंद्रिय शेती परिसंवाद व पुरस्कार वितरण समारंभ अतिशय उत्साहात पार पडला. विविध विषयांतील सोळा नामांकित तज्ज्ञांनी सर्वदूर महाराष्ट्र राज्यातून आलेल्या शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ, खान्देश आदी विभागांतून आलेले सेंद्रिय शेती करणारे शेतकरी या कार्यक्रमास उपस्थित होते. सेंद्रिय शेतीत काम करणारे तज्ज्ञ व शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रबोधन हा एकमेव उद्देश असलेला हा आगळा वेगळा सेंद्रिय शेती परिसंवाद संबंधित सर्वांच्या सदैव स्मरणात राहील. ■